# स्तन कर्करोगाच्या रुग्णांमध्ये वाढ

आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** जागतिक पातळीवर महिलांच्या मृत्यू आणि आजाराचे मुख्य कारण स्तनाचा कर्करोग असल्याचे समोर आले आहे. १९९० ते २०२३ या काळात भारतामध्ये या आजाराच्या रुग्णांच्या संख्येत ४७७ टक्क्यांची तर मृत्यूमध्ये ३५२ टक्क्यांची वाढ झाल्याचे नव्या अभ्यासातून समोर आले आहे.

'द लॅन्सेट ऑन्कोलॉजी' या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार, २०२३ मधील २३ लाख प्रकरणांच्या तुलनेत २०५० पर्यंत जगभरातील स्तनाच्या कर्करोगाच्या रुग्णांची संख्या एकतृतीयांशाने वाढून ३५ लाखांपेक्षा अधिक वाढण्याचा अंदाज आहे. तसेच वार्षिक मृत्यूंची संख्या ४४ टक्क्यांनी वाढून सुमारे १३.७ लाखांपर्यंत पोहोचू शकते. हा अभ्यास अमेरिकेतील आयएचएमई, वॉशिंग्टन विद्यापीठातील केयली बॅंगडिया यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला.

अभ्यासानुसार, २०२३ मध्ये भारतात सुमारे २.०३ लाख स्तनाच्या कर्करोगाचे रुग्ण नोंदवले गेले. ही संख्या १९९० च्या तुलनेत सुमारे ४७७ टक्क्यांनी जास्त आहे. १९९० पासून मृत्यूंच्या संख्येत ३५२.३ टक्क्यांची वाढ होत १ लाखांहून अधिक महिलांचा मृत्यू झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या आजाराचा परिणाम जगभरात सारखा नाही. उच्च-उत्पन्न असलेल्या देशांच्या तुलनेत निम्न व मध्यम-उत्पन्न असलेल्या देशांमध्ये या आजाराचा अधिक गंभीर प्रभाव दिसून येतो.







# एसटीला पाच वर्षांत जाहिरातीतून २५० कोटी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

मुंबई : एसटी महामंडळाला पुढील पाच वर्षांत केवळ जाहिरातींच्या माध्यमातून तब्बल २५० कोटी रुपयांपेक्षा अधिक महसूल मिळणार असल्याची माहिती परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. एसटी महामंडळाच्या मुख्यालयात पार पडलेल्या ३१० व्या संचालक मंडळाच्या बैठकीत ते बोलत होते.

सरनाईक म्हणाले, एसटी महामंडळाची २५१ आगारे आणि ६१० पेक्षा अधिक लहान-मोठी बस स्थानके आहेत. सुमारे १२ हजार बसमधून दररोज ५० ते ५५ लाख प्रवाशांची ने-आण केली जाते. भविष्यात बससंख्या वाढल्यानंतर दैनंदिन प्रवासी संख्या १ कोटींपर्यंत जाईल. अशा व्यापक पोहोच असलेल्या माध्यमावर जाहिरात देणे म्हणजे उत्पादकांसाठी सुवर्णसंधीच आहे. त्या दृष्टीने बस स्थानके, त्यांचा परिसर, बसच्या आतील व बाहेरील भाग तसेच उपलब्ध सर्व संसाधनांचा पुरेपूर वापर करून जाहिरात महसूल वाढविण्याचा महत्त्वाकांक्षी आराखडा तयार करण्यात आला आहे. यासाठी स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून, पुढील पाच वर्षांसाठी २५० कोटी रुपयांहून अधिक महसूल देणारी निविदा स्वीकारण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सद्यःस्थितीत कार्यरत असलेल्या जाहिरात परवानाधारकांचा परवाना कालावधी समाप्त झाल्यानंतर जाहिरातीचे अधिकार नवीन परवानाधारकांकडे जाणार आहेत. सध्या जाहिरातींद्वारे दरवर्षी २२ कोटींचे उत्पन्न मिळते. नव्या निविदेमुळे या उत्पन्नात तब्बल दुपटीपेक्षा जास्त वाढ होणार आहे. यामुळे भविष्यात एसटीवर तोट्याच्या गर्तेत जाण्याची वेळ येणार नाही, असा विश्वास सरनाईक यांनी व्यक्त केला.

## देशातील पहिली हायड्रोजन रेल्वेगाडी हरियाणामध्ये

**मुंबई :** डिझेल आणि विजेविना आता हायड्रोजन इंधनावरील रेल्वेगाडी धावण्यास सुरुवात झाली आहे. देशातील पहिल्या हायड्रोजन रेल्वेगाडीची चाचणी हरियाणातील जिंद- ललित खेरादरम्यान घेण्यात आली असून चाचणीदरम्यान ही रेल्वेगाडी ताशी ७० किमी वेगाने धावली. हायड्रोजन रेल्वेगाडीची चाचणी यशस्वीपणे पार पडली असून पुढील आठवडाभर विविध टप्प्यातील चाचणी करण्यात येणार आहे.

भारतातील पहिल्या हायड्रोजनवरील रेल्वेगाडीची सोमवारी हरियाणामध्ये सुरळीत चाचणी घेण्यात आली असून भारताने हरित रेल्वे प्रवासासाठी एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. आठ डब्यांची रेल्वेगाडी सकाळी ८.३० वाजता जिंद रेल्वे स्थानकावरून सुटली आणि ललित खेराच्या दिशेने निघाली. या रेल्वेगाडीने २० किमी अंतर ७० किमी प्रतितास वेगाने पार केला. त्यानंतर पुन्हा परतीच्या प्रवासासाठी ती मार्गस्थ झाली. रेल्वे प्रशासनाच्या माहितीनुसार, ही रेल्वेगाडी पूर्णपणे हायड्रोजन फ्युएल सेल तंत्रज्ञानावर आधारित असून पारंपरिक डिझेल, वीज, कोळशाविना धावणार आहे. त्यामुळे कार्बन उत्सर्जनात मोठी घट होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पर्यावरणपूरक आणि हरित ऊर्जेच्या दिशेने रेल्वेचे हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

# 'गिग' कामगारांसाठी स्वतंत्र कायदा नाहीच!

## राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा मंडळामार्फत लाभ देण्याचा सरकारचा निर्णय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्य सरकारने गिग आणि डिजिटल माध्यमांशी जोडलेल्या कामगारांसाठी स्वतंत्र कायदा करण्याचा निर्णय रद्द केला आहे. या कामगारांच्या कल्याणासाठी राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा मंडळ स्थापन करण्यात येणार असून त्याद्वारे सुमारे ३५० डिजिटल माध्यमांशी जोडलेल्या किमान दहा लाख गिग कामगारांना लाभ दिला जाणार आहे.

कामगारमंत्री आकाश फुंडकर यांनी शनिवारी विधानसभेत केंद्र सरकारच्या सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० नंतर, स्वतंत्र राज्य कायद्याची आवश्यकता नसल्याचे सांगितले. त्यामुळे या कायद्याबाबत राज्य सरकारने केलेल्या घोषणेची आता अंमलबजावणी होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्य सरकारने नोव्हेंबर २०२५ पासून केंद्र सरकारच्या सामाजिक सुरक्षा संहितेची अंमलबजावणी सुरू केली आहे. गिग कामगारांसाठी राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा मंडळ स्थापन करण्यात येणार असून त्याअंतर्गत मातृत्व आणि वृद्धापकाळाचे भत्ते, अपंगत्व संरक्षण, शैक्षणिक सुविधा आणि इतर कल्याणकारी योजना लागू केल्या जाणार आहेत. राज्य सरकारने असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी एक स्वतंत्र मंडळ स्थापन करण्याची योजना आखली असून या मंडळाद्वारे कल्याणकारी योजना, सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी, आरोग्य आणि गृहनिर्माण योजना राबविण्यात येणार आहे.



गिग कामगारांसाठी स्वतंत्र राज्य कायदयाची आवश्यकता नसली तरी केंद्राच्या सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० ची राज्यात योग्य आणि ठोस अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. गिग कामगारांची केंद्राकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. गिग कामगारांसाठी पायाभूत सुविधा उभारण्याची गरज आहे.
**– डॉ. केशव क्षीरसागर,** अध्यक्ष, भारतीय गिग कामगार मंच

### गिग कामगार किती ?

डिजिटल माध्यमांशी जोडलेल्या गिग कामगारांची अचूक संख्या राज्याच्या कामगार विभागाकडे देखील नाही. विक्री कर आणि वस्तू व सेवा कर (जीएसटी) नोंदींद्वारे गिग कामगारांबाबत अधिक माहिती गोळा होते. अलीकडे भारतातील शहरांमध्ये गिग डिजिटल अर्थव्यवस्थेचा विस्तार अत्यंत वेगाने होताना दिसत आहे. सहज प्रवेश असणाऱ्या या नवीन अर्थव्यवस्थेत शहरी आणि स्थलांतरित युवकांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होत आहेत. नीती आयोगाच्या 'इंडियाज बुमिंग गिग अँड प्लॅटफॉर्म इकॉनॉमी (२०२२)' या अहवालानुसार देशात २०२०-२१ मध्ये सुमारे ७७ लाख गिग कामगार होते. त्यांची संख्या तिपटीने वाढून २०२९-३० मध्ये २.३५ कोटी एवढी होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

# सिद्दिकी हत्या प्रकरणाशी बिल्डरांचा संबंध नाही

## मुंबई पोलिसांचा उच्च न्यायालयात दावा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार) नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्येमागे बांधकाम व्यावसायिक लॉबीचा सहभाग किंवा कोणताही संबंध नाही. किंबहुना, सिद्दिकी कुटुबीयांकडून त्याबाबत करण्यात येणारा आरोप हा कोणत्याही ठोस पुराव्याशिवाय आणि केवळ संशय व अनुमानांवर आधारित आहे, असा दावा मुंबई पोलिसांनी उच्च न्यायालयात केला. याबाबत मुंबई पोलिसांमार्फत न्यायालयात नुकतेच प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले.

कोणत्याही बांधकाम व्यावसायिकाचा सिद्दिकी हत्या प्रकरणाशी संबंध असल्याचे पुरावे सापडलेले नाहीत. याउलट ही हत्या अनमोल बिश्नोईच्या नेतृत्वाखालील संघटित टोळीने दहशत निर्माण करण्यासाठी आणि वर्चस्व व आर्थिक लाभ मिळविण्यासाठी केली होती हे तपासाअंती सिद्ध झाल्याचा दावाही साहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) किशोरकुमार शिंदे यांनी प्रतिज्ञापत्रात केला. तसेच अनमोल बिश्नोईला अमेरिकेतून प्रत्यार्पण करण्यास भाग पाडणे, हे तपास अधिकाऱ्यांनी आपली कर्तव्ये कायद्याच्या अधीन राहून प्रामाणिकपणे पार पाडल्याचे द्योतक आहे, असेही प्रतिज्ञापत्रात नमूद केले. त्यामुळे बाबा सिद्दिकी यांच्या पत्नी शहझीन यांनी पोलिसांविरुद्ध केलेले आरोप हे चुकीचे आणि बिनबुडाचे तसेच न्यायालयात पोलीस यंत्रणेची प्रतिमा मलीन करण्याच्या गुप्त हेतूने केला आहे. तसेच शहझीन सिद्दिकी या पोलीस अधिकाऱ्यांवर त्यांच्या इच्छेनुसार गुप्त हेतूने प्रकरणाचा तपास करण्यासाठी दबाव आणण्याचा प्रयत्न करत असल्याचा दावाही पोलिसांनी केला आहे.



बाबा सिद्दिकी हत्या प्रकरणात पोलिसांनीखऱ्या गुन्हेगारांना अटक करण्यास जाणूनबुजून टाळाटाळ केली असून पतीच्या मृत्यूमागे बिल्डर लॉबी आणि एका राजकीय नेत्याचा सहभाग असल्याचा दाट संशय व्यक्त करीत सिद्दिकीच्या पत्नी शहझीन यांनी उच्च न्यायालयात धाव घेत स्वतंत्र तपास संस्थेद्वारे हत्येच्या चौकशीची मागणी केली आहे.







**SBI**

नेटवर्क टेक्नोलॉजी विभाग, भारतीय स्टेट बँक, ग्लोबल आयटी- सेंटर सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई – ४००६१४

**शुध्दीपत्र – ८**

कृपया नेटवर्क परफॉर्मन्स मॉनिटरिंग आणि डायग्नोस्टिक (एनपीएमडी) सोल्यूशनच्या खरेदीसाठीदि. २०.११.२०२५ रोजीचे आरएफपी क्र. SBI/GITC/NWTech/२०२५-२६/१४११ पहावे. दिनांक २७.०२.२०२६ रोजीचे शुध्दीपत्र – ८ बँकेच्या **https://sbi.bank.in** वेबसाईटवर प्रोक्युअरमेंट न्यूज विभागांतर्गत किंवा ई प्रोक्युअरमेंट एजन्सीच्या **https://etender.sbi/SBI/** या पोर्टलवर पहाता येऊ शकेल.

स्थान: नवी मुंबई
दिनांक: ०४.०३.२०२६

स्वाक्षरी / – उप महाप्रबंधक (नेटवर्क टेक्नोलॉजी विभाग)






भविष्यानेही आशेने पाहावे अशा वर्तमानाचा गौरव

साहित्य-कलेपासून समाजसेवेपर्यंत, विज्ञान-तंत्रज्ञानापासून राजकारणापर्यंत विविध क्षेत्रांत पाय रोवून काम करणारे अनेक तरुण आपल्या भोवती आहेत. आपल्या तेजाने तळपणाऱ्या,परंतु सहसा माध्यमांच्या प्रकाशझोतात न आलेल्या, वयाच्या चाळिशीच्या आतील '**तरुण तेजांकितां**'चा शोध.

MIDC प्रस्तुत
लोकसत्ता तरुण तेजांकित २०२५
सहप्रायोजक
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
महानिर्मिती
PNG Jewellers
नॉलेज पार्टनर
pwc
लोकसत्ता लोकमान्य लोकशक्ती



**प्रत्यक्ष ताबा सूचना**

ICICI Home Finance **नोंदणीकृत कार्यालय** : आयसीआयसीआय बँक टॉवर्स, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू), मुंबई-४०००५१.
**कॉर्पोरेट कार्यालय** : आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, जे.बी. नगर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पू), मुंबई-४०० ०५९.
**शाखा कार्यालय** : दुसरा मजला, ऑफिस नं. २०२, कोहिनूर पॅराडाईज, सर्व्हे नं. २८४, शिवाजी नगर, रत्नागिरी-४१५६१२.

ज्याअर्थी

"आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड"च्या प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२च्या रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत, उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता याखाली नमूद केलेल्या ऋणकोंना मागणी सूचना निर्गमित केल्या आहेत.

ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने, ऋणको आणि आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात आली आहे की, निम्नस्वाक्षरीकारांनी याखालील नमूद केलेल्या तारखांदिवशी उक्त रुल्सच्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त अ‍ॅक्टच्या सेक्शन १३(४) अंतर्गत त्याला / तिला प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषकरून ऋणको आणि आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार "आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड"च्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे.

सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता अ‍ॅक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (८) च्या तरतुदींकडे ऋणकोचे लक्ष वेधीत आहोत.

| अ. क्र. | ऋणको/ सह-ऋणकोचे नाव/ लोन अकाऊंट नंबर | मालमत्तेचे वर्णन/ ताब्याची तारीख | मागणी सूचनेची तारीख/ मागणी सूचनेमधील रक्कम (रु.) | शाखेचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | प्रदिप कुमार (ऋणको), बसंती देवी (सह-ऋणको) – LHRTG00001473145 | फ्लॅट नं. ४०२, ए-२ बिल्डिंगमधील, मुस्कान हाईट्स, जोगळे, ता. दापोली, जि. रत्नागिरी, २६डी दापोली, महाराष्ट्र-४१५७१२. पुढीलप्रमाणे सिमित : पूर्व : फ्लॅट नं. ४०३, पश्चिम : ओपन स्पेस, उत्तर : लिफ्ट, दक्षिण : फ्लॅट नं. ४०१ / ताब्याची तारीख : २७-०२-२०२६. | २३.०७.२०२५ रु. १७,४५,१४७/- | रत्नागिरी |
| २. | प्रदिप कुमार (ऋणको), बसंती देवी (सह-ऋणको) – LHRTG00001473163 | फ्लॅट नं. ४०२, ए-२ बिल्डिंगमधील, मुस्कान हाईट्स, जोगळे, ता. दापोली, जि. रत्नागिरी, २६डी दापोली, महाराष्ट्र-४१५७१२. पुढीलप्रमाणे सिमित : पूर्व : फ्लॅट नं. ४०३, पश्चिम : ओपन स्पेस, उत्तर : लिफ्ट, दक्षिण : फ्लॅट नं. ४०१ / ताब्याची तारीख : २७-०२-२०२६. | २३.०७.२०२५ रु. ८०,५१०.८४/- | रत्नागिरी |

वर नमूद केलेले ऋणको/ हमीदारांना याद्वारा रकमेच्या परतफेडीकरिता ३० दिवसीय सूचना निर्गमित केली आहे, अन्यथा सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ च्या रुल्स ८ व ९ अंतर्गत तरतुदींच्या अनुसार, गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ३० दिवसांच्या समाप्तीनंतर विक्रि करण्यात येईल.

दिनांक : ०४ मार्च, २०२६
स्थळ : रत्नागिरी

प्राधिकृत अधिकारी,
आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड



बँक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra भारत सरकार का उद्यम एक परिवार एक बैंक

**मालेगांव अंचल कार्यालय**
बी.एस.एन.एल. संचार सदन, सटाणा नाक्याजवळ मालेगाव 423203
प्रधान कार्यालय: लोकमंगल 1501, शिवाजीनगर, पुणे - 411005.

**स्थावर मालमत्ताच्या विक्री करिता विक्री सूचना**

दि सेक्यूरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रकशन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट्स अ‍ॅक्ट 2002 आणि त्यासह वाचण्याच्या सेक्युरिटी इंटरेस्ट्स (एन्फ़ार्समेंट) रुल्स 2002 मधील रुल 8(6) च्या अटींनुसार स्थावर मालमत्ताच्या विक्री करिता ई- ऑक्शन विक्री सूचना

या ठिकाणी सर्व साधारण जनतेस आणि विशेष करुन कर्जदार आणि जामिनदाराना सूचना देण्यात येते की , खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्ता , ज्या सुरक्षित धनको (सिक्युर्ड क्रेडिटर) बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या कड़े गहाण / बोज्या अंतर्गत आहेत आणि बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकाऱ्यानी सदर मालमत्तांचा **प्रत्यक्ष ताबा** घेतला असून, सदर मालमत्तांची विक्री **दि. 23/03/2026 रोजी दु 01.00 ते 05.00 दरम्यान "जसे आहे जेथे आहे ", जे आहे जसे आहे, "तेथे जे आहे"** , या तत्वावर बँक ऑफ महाराष्ट्र यांना खाली नमूद केलेल्या परिशिष्टामधील कर्जदार व जामीनदार यांच्या कडून येणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी ई – ऑक्शनद्वारे केली जाणार आहे कर्जदार आणि जामिनदारांकडून येणे असलेल्या रकमेचा तपशील, स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन आणि त्यावरील माहिती असलेला बोज़ा, ताब्याचा प्रकार,राखीव किमत, बयाणा रक्कम पुढील प्रमाणे आहे.

| अनु. क्र. | कर्जदाराचे / जामीनदारांचे नाव | येणे रक्कम | स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन आणि माहीत असलेला बोज़ा | राखीव किमत / बयाणा रक्कम / बोली वाढविण्याची रक्कम (सर्व तीन कर्जदार खात्यांची एकत्रित रक्कम) |
|---|---|---|---|---|
| 1. | कर्जदार:- मेसर्स जी ए फार्मा हब त्यांच्या द्वारे प्रोप्रायटर श्री. दीपक गणेश खैरनार जमानतदार :- श्री. विकास अशोक गुलेचा (मालेगाव मुख्य शाखा) | रु. 69,07,145/- 08/01/2025 च्या मागणी सुचनेनुसार, अधिक लागु न झालेले व्याज, वसुलीच्या तारखेपर्यंत इतर कायदेशिर खर्च/ शुल्क | नोंदणीकृत गहाण असलेले संपूर्ण भाग आणि तुकडा असलेले जमिन आणि बिल्डींग असलेले प्लॉट नं. 13 आणि 14, सर्व्हे नं. 25 आणि 26, शिवार तेहेरे, तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक - 423203, क्षेत्रफळ एरीया 348 चौ.मी. संपत्ती श्री. दिपक गणेश खैरनार यांच्या मालकीचे. **चर्तुसिमा : पूर्व** - तुकडा नं. 15, **पश्चिम** - तुकडा नं. 12, **उत्तर** - 7 मी रोड, **दक्षिण** - तुकडा नं. 16, 17 आणि 18. | रु. 58,08,000/- (रुपये अठ्ठावन्न लाख आठ हजार फक्त) / रु. 5,80,800/- (रुपये पाच लाख ऐंशी हजार आठशे फक्त) / रु. 50,000/- (रुपये पन्नास हजार फक्त) |

**मालमत्तेच्या पहाणीची तारीख व वेळ : दिनांक 03/03/2026 ते 22/03/2026 रोजी सकाळी 11.00 ते सायंकाळी 05.00 दरम्यान.**
**बयाना रक्कम आणि प्रूफ सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ : दिनांक 22/03/2026 रोजी साय 5.00 पर्यंत.**
विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्ती जाणून घेण्यासाठी कृपया बँकेच्या वेबसाइट वरिल लिंक - "http://www.bankofmaharashtra.in/propsale.asp" तसेच पिएसबी अलायंस ई-बिक्रय https://baanknet.com/eauction-psb/x-login वर देखील प्रदान केले आहे किंवा यांच्याशी संपर्क साधवा **श्री. चेतन कापडणीस, मोबाईल नं. 8956495433, श्री. अनस अली, मोबाइल नं. 9718617198, श्री. ज्ञानेश्वर धादाडे, मुख्य व्यवस्थापक, मोबाइल नं. 8459141304**

**स्थान : मालेगाव**
**दिनाक : 02/03/2026**
(सदर नोटीस ही मूळ इंग्रजी नोटिसचे भाषांतर असून, अर्थाच्या सोयीकरीता इंग्रजी भाषेतील नोटीस ग्राह्य धरली जाईल)
**अधिकृत अधिकारी**
**बँक ऑफ महाराष्ट्र मालेगाव झोन**



isarc **इंडिया एसएमई अ‍ॅसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड**
(ऑथम इन्व्हेस्टमेंट अ‍ॅण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडची ("एआयआयएल") उपकंपनी)
CIN : U67190MH2008PLC181062
नोंदणीकृत कार्यालय : दि रुबी, ११वा मजला, उत्तर-पश्चिम विंग, प्लॉट नं. २९, सेनापती बापट मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई-४०००२८.

**ई-लिलाव-नि-विक्रीकरिता जाहीर सूचना (परिशिष्ट IV-ए) (रुल ८(६))**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या ("**रुल्स**") रुल ८ (६) च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

सूचना याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको व हमीदारांना देण्यात आली आहे की, याखाली वर्णिलेली स्थावर मालमत्ता **इंडिया एसएमई अ‍ॅसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड**कडे (**आयएसएआरसी-२०२५-२०२६-३ ट्रस्टची ("आयएसएआरसी")** विश्वस्त म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली) **दिनांकित २६ सप्टेंबर २०२५ अभिहस्तांकन करारनाम्याद्वारे "फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लि."ची अभिहस्तांकिती म्हणून** (यापुढे "**सुरक्षित धनको**" म्हणून संदर्भित) गहाण असलेल्या / ताब्यात असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा "आयएसएआरसी", सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारींनी (सांविधिक/भौतिक) ताबा घेतला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री **अनिल आत्माराम बागूल ("ऋणको") आणि लक्ष्मी अनिल बागूल** (यापुढे "हमीदार/गहाणकार" म्हणून संदर्भित) (यापुढे गहाणकाराचे कायदेशीर वारसदार म्हणून संदर्भित) (एकत्रीतरीत्या "ऋणको/ हमीदार / गहाणकार" म्हणून संदर्भित) यांच्याकडील "आयएसएआरसी"करिता देणी व देय, त्यावरील पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, किंमत, आकार, इ.सह एकत्रीत "**आयएसएआरसी**"**करिता ३१ जाने. २०२६ रोजीप्रमाणे रु. २९,२७,२५१.१९/- (रुपये एकोणतीस लाख सत्तावीस हजार दोनशे एकावन्न व पैसे एकोणीस फक्त) या एकूण रकमेच्या वसुलीकरिता १० एप्रिल २०२६ रोजी "जसे आहे जेथे आहे" "जसे आहे जे काही आहे" व "जे काही आहे तेथे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय"** या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

स्थावर मालमत्तेचे सविस्तर वर्णन, पाहाणीची तारीख, राखीव किंमत व इसारा रक्कम ठेव (इरठे) खालीलप्रमाणे असणार आहे :

| मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत | इरठे |
|---|---|---|
| "पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे – फ्लॅट नं. १३, मोजमापाचा बिल्ट-अप एरिआ ६३.१९ चौ.मी., तिसरा मजला, बांधकाम केलेल्या बिल्डिंगपैकी, जी "एके हाईट" म्हणून ज्ञात आहे, प्लॉट नं. ३ मोजमापाचा ६९७.८८ चौ.मी. यावर बांधकाम केलेले, सर्व्हे नं. २४८/ ४ए / बी१ / + बी२ व येथे स्थित – मौजे म्हसरूल, भास्कर सोसायटीजवळ, बोर्गाड दिंडोरी रोड, नाशिक – ४२२००४." | रु. १७,१०,०००/- (रुपये सतरा लाख दहा हजार फक्त) | रु. १,७१,०००/- (रुपये एक लाख एकाहत्तर हजार फक्त) |

**मालमत्तेच्या पाहाणीची तारीख व वेळ : ०६ एप्रिल २०२६ रोजी स. ११.०० व सायं. ०५.०० दरम्यान (वेळ)**
**इरठेच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख व वेळ : ०९ एप्रिल २०२६ रोजी सायं. ०५.०० वा. पर्यंत केवळ www.bankeauction.com या वेबसाइटवरून ऑनलाइन प्रणालीत**
**ई-लिलावाची तारीख व वेळ : १० एप्रिल २०२६ रोजी स. ११.०० वा. पासून ते दु. ०१.०० वा. पर्यंत (वेळ)**
**शेवटच्या पाच मिनिटांत लावलेल्या बोलींच्या बाबतीत प्रत्येकी पाच मिनिटांच्या स्वयं-विस्तारासह.**
**लिलावाचे आयोजन "आयएसएआरसी"चे मान्यताप्राप्त सेवा-पुरवठाकार "सी१ इंडिया प्रा. लि.", उद्योग विहार, फेज २, गल्फ पेट्रोकेम बिल्डिंग नं. ३०१, गुरगाव, हरयाणा पीन-१२२०१५ यांच्याद्वारे करण्यात येणार आहे.**
**हेल्पलाइन नं. +९१-१२४-४३०२०२०/२१/२२/२३/२४ किंवा +९१ ९५९४५९७५५५, हेल्पलाईन ई-मेल आयडी : Support@bankeauctions.com, बोलीप्रक्रियेकरिता https://www.bankeauctions.com या वेबसाइटवर लॉग-ऑन करा.**
**संपर्क व्यक्ती/संपर्क क्रमांक : श्री. गीतेश तुपे, मोबा. नं. : ९२८४९०२९०३.**

विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया www.isarc.in या "इंडिया एसएमई अ‍ॅसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लि."च्या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी.

स्वाक्षरी/-
प्राधिकृत अधिकारी,
इंडिया एसएमई अ‍ॅसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी (आयएसएआरसी) लिमिटेड
(ऑथम इन्व्हेस्टमेंट अ‍ॅण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडची ("एआयआयएल") उपकंपनी)
आयएसएआरसी-२०२५-२०२६-३ ट्रस्टची विश्वस्त म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली

दिनांक : ०४.०३.२०२६
स्थळ : नाशिक